

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार : आदर्श नियम

१. सदरचा पुरस्कार विद्यापीठाशी संलग्नित शैक्षणिक संस्थेस दिला जाईल. सदर पुरस्कार किमान १० वर्षे शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थेस दिला जाईल. पुरस्कार प्राप्त शैक्षणिक संस्थांना पुढील १० वर्षानंतर पुन:श्च पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.

२. संबंधीत संस्थेचे कार्य सोलापूर जिल्हाशी निगडीत असेल अशा शैक्षणिक संस्थेचा पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

३. सदर संस्थेच्या संस्थापकाचा ध्येयवाद प्रारंभापासून आजतागायत जोपासना केलेला असावा. तसेच संस्थेने प्रारंभापासून परिसरातील गोरगरीब मुला-मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणे आवश्यक आहे.

४. सदर संस्थेने समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविलेले असावेत. सदर संस्थेचे माजी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना देशात व परदेशात विविध क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळालेले असावे.

५. सदर संस्थेच्या विकासासाठी लागणारे अर्थसहाय्य शासन तसेच समाजाकडून प्राप्त झालेले असावे. तसेच संस्थेच्या अर्थकारणात विविध उपक्रम राबविलेले असावेत.

६. आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत संस्थेची वाटचाल असावी.

७. सदर संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य समाजाभिमुख व कार्यक्षम असावेत.

८. शैक्षणिक कार्याव्यतिररिक्त इतर समाजास उपयुक्त क्षेत्रामध्ये काम करून संस्थेने समाजसेवा केलेली असावी.

९. संस्थेशी संबंधीत फौजदारी गुन्हा या सारख्या गंभीर बाबतीत गुन्हा सिध्द झालेला नसावा. तसे स्वयंघोषणापत्र स्वतंत्ररित्या प्रस्तावासोबत जोडावे.

१०. सदर संस्थेचे विद्यापीठाच्या विरोधात कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नसावे.

११. संबंधीत संस्थेस काही शासकीय/अशासकीय पुरस्कार मिळाले असतील अशा संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.

१२. संस्थेमार्फत चालविण्यात जाणाऱ्या सर्व महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन / पुनर्मूल्यांकन झालेले असावे.

१३. विद्यापीठाने सदर पुरस्कारासाठी गठित केलेली निवड समिती उपरोक्त मुदयांचा विचार करून योग्य त्या एका शैक्षणिक संस्थेची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करेल.

१४. प्राप्त प्रस्तावांमध्ये समितीस एकही प्रस्ताव पुरस्कार योग्य न वाटल्यास पुरस्कार देण्यात येणार नाही. तसेच पुरस्कारासंबंधी समितीचा निर्णय अंतिम राहील.

# उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार प्रश्नावली

१) संस्थापकाचे नाव : ____________________

२) संस्थेचे नाव व पत्ता :____________________

३) संस्थेची स्थापना वर्ष :____________________

४) किती शाखा सध्या कार्यरत आहेत : ____________________

५) संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहे काय ?____________________

६) संस्थेत कोणत्या स्तरापर्यंत शिक्षण दिले जाते ?____________________

७) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणते उपक्रम राबविले जातात ?

८) संस्थेमार्फत समाजाभिमुख कोणते कार्यक्रम राबविले जातात ?

९) देशात व परदेशात आपल्या कार्यकर्तृत्वाने नावलौकिक मिळविणारे विविध शिक्षक विद्यार्थी असल्यास त्याबद्दल माहिती दयावी.

१०) संस्थेच्या विकासात अर्थ सहाय्य कसे उपलब्ध केले जाते ? त्यात समाजाच्या वाटा किती असतो ?

११) आधुनिक तंत्रज्ञानाची सुसंगत संस्थेचे वाटचाल कशी चालू आहे ?

१२) संस्थेला आतापर्यंत कोणकोणते पुरस्कार मिळाले आहेत ?

१३) संस्थेमार्फत शैक्षणिक कार्याव्यातिरिक्त इतर कोणती समाजाभिमुख कार्ये केली जातात ?

१४) संस्थेशी संबंधित न्यायप्रविष्ठ अथवा फौजदारी गुन्हा सारख्या बाबी आहेत काय ? नसल्यास तसे हमीपत्र द्यावे.

१५) संस्थेच्या विकासासाठी भावी योजना कोणत्या आहेत ?

१६) संस्थेमार्फत चालविल्या जाणा-या शाळा, महाविद्यालये, वसतिगृह, समाजोपयोगी प्रकल्प यांची माहिती द्यावी.

१७) या व्यतिरिक्त आपल्या इतर अभिनव उपक्रमांची माहिती द्यावी.

१८) उपरोक्त मुद्यांसंदर्भात आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावा.

१९) संस्थेद्वारे चालविल्या जाणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन / पुनर्मूल्यांकन झाले आहे का ?